## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. १६३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/०४/२०१८

**१) हिस्से वाटयावरून भांडण करून धारदार चाकुने मारून गंभिर जखमी करून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोद:–**

दिंनाक ०१/०४/२०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी व आरोपी यांचे घराचे हिस्से वाटयावरून वाद झाल्याने भांडण होवुन अरोपीने त्याचे घरातील धारदार चाकु हातात घेवुन येवुन फिर्यादीचे पोटावर, कुशीवर,मांडीवर धारदार चाकुने मारून फिर्यादीला गंभिर रित्या जखमी करून जिवेनाशी मारण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादी मंगेश रामस्वरूप कोकासे वय ३० वर्ष रा. काटे बाम्हणी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३०७, भादवी. सहकलम ४(२५) भाहका. सहकलम १३२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. म्हैसकर पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) विवाहीतेला शारीरीक व मानसीक त्रास देवुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद:–**

दिंनाक ०१/०६/२०१७ ते आज पावे तो यातील फिर्यादी हिला आरोपीतांनी संगनमत करून शारीरीक व मानसीक त्रास देवुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४९८ (अ) २९४, ५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनी. आतराम पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) महिलेस अश्लिल शब्दात बोलुन शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद:–**

दिंनाक ०२/०४/२०१८ चे १२.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही तिचे मुलागा व मुलगी सोबत राहत असुन फिर्यादी ही घरी एकटीच हजर असतांनी यातील आरोपी हा घरी येवुन खुर्चीवर बसुन अश्लिल शब्दात बोलुन व ढकलढुकल करून शिवीगाळ केल्याने, फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४ अ (२)ब, ५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनी. आतराम पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) मोटार सायकच्या धडकेत सायकलस्वार एक जखमी ;–**

दिंनाक ०२/०४/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने आपले ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन यातील जखमी सुनिल वासुदेव वासनिक वय ३५ वर्ष रा. शाहापुर याचे सायकलला मागेहुन धडक देवुन जखमी केल्याने फिर्यादी दिपक देवदास गजभिये वय ५० वर्ष रा. सितेपार यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**५) अवैध रित्या रेती चोरी करून पळुन गेल्याने गुन्हा नोंद ;–**

दिंनाक २९/०३/२०१८ चे १७.१५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालक मालक यांनी त्याचे ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ एल ३६६१ मध्ये गौण खनिज रेती अंदाजे १ ब्रॉस कि. १०४००/रु. ची अवैदय रित्या भरून चोरी करून पळुन गेल्याने फिर्यादी रमेश माधवजी भुरे वय ५३ वर्ष रा. सहकारनगर भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोगांडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**६) शिवीगाळ करून विटाचा तुकडा डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद;–**

दिंनाक ०२/०४/२०१८ चे ०९.३० वाजता दरम्यान यातील अनोळखी आरोपी हा फिर्यादीचे घरासमोरील रस्त्यावर लघवी करीत असतांना दिसला त्यामुळे फिर्यादीने आरोपीस हटकले असता फिर्यादीला शिवीगाळ करून तेथील विटाचा तुकडा उचलुन डोक्यावर मारून जखमी केल्याने, फिर्यादी अशोक रमेश बागडे वय ४१ वर्ष रा. राणी लक्ष्मीबाई वार्ड बहीरंगेश्वर व्याम शाळा चे मागे खात रोड भंडारा यांचे तोडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगवे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**७) जुने मतभेदावरून भांडण करून लाकडी दांडयाने मारून जखमी करून शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद;–**

दिनाक ०२/०४/२०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी जखमी कमलेश रामस्वरूप कोकासे वय २८ वर्ष रा. काटेबाम्हणी हा व आरोपी हे सख्खे भाऊ असुन त्यांचे आपसात जुने मतभेद आहेत यातील आरोपीने 'मला दारूडया का म्हटले' या कारणा वरून फिर्यादीला लाकडी दांडयाने, खांदयावर ,दंडावर, पंज्यावर मारहान करून जखमी करून शिवीगाळ केल्याने जखमीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२५,५०४ भादवी. सहकलम १३५ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी.खैरकर पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**८) मानवी जिवीतास धोका पोहचवुन वाहतुकीस अडथडा निर्माण करून मा. जिल्हाधीकारी सा. भंडारा यांचे आदेशाचे उल्लघन केल्याने गुन्हा नोंद;–**

दिनाक ०२/०४/२०१८ चे १६.४५ वाजता दरम्यान यातील अनुसुचितजाती जमाती अत्याचार प्रतीबंधक कायदयाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालावर निषेध म्हणुन भारत बंद असल्याने मा. जिल्हाधीकारी सा. भंडारा यांचे अ.क्र. /दंड/का. व.सु/का.वी/५५४/१८ दिनांक २३/०३/२०१८ चे पत्रकानुसार दि. २२/०३/२०१८ ते १५/०४/२०१८ प्रयत्न कलम ३७(१)(३) मपोका. १९५१ चे आदेश झाले असतांना नमुद घटना ता वेळी व ठिकाणी काही अज्ञात १० ते १२ इसमांनी टायर जाळुन मानव जिवीतास धोका पोहचवुन वाहतुकीस अडथडा निर्माण केला व जिल्हाधीकारी सा. भंडारा यांचे आदेशाचे उल्लघन केल्याने सरतर्फे पोना. शिवनकर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १४३,२८५ भादवी. सहकलम १३५ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनी. आडे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**९) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु ;–**

दिनाक ०१/०४/२०१८ चे १३.०० वाजता दरम्यान यातील मृतक परसरमल गोपाल पिंपळकर वय ४० वर्ष रा. सातोना हा दारूचे अतिसेवन केल्याने सामान्य रूग्नालय भंडारा वार्ड क्र. ०९ येथे भरती होवुन उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पो.स्टे.ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. गाढवे यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.ना. श्रीरामे पोलीस स्टेशन वरठी करीत आहेत.

**१०) अवैध दारु अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक ०२/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर व लाखांदुर येथे अवैध दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०४ लिटर हातभंट्टी दारू किमती ४००/रु. व ०७ लिटर ९२० मिलीलीटर देशी दारू + १ मोसा किमती ३२,२८८/रु. असा एकुन ३२,६८८/रु.चा माल जप्त करण्यात आला.

**११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०२/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी – ०७ तीन सिटर वाहनाकरीता ०४ ईतर वाहनांवरती – ८४ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनी. मीया चाटसे)
महिला सेल भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.